**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - २०**

मा.प्रशासक ठराव क्र.२२८ — विषय क्रमांक- २२८

दिनांक- ०२/०९/२०२४ — विभाग - घनकचरा व्यवस्थापन विभाग

**विषय :-** स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत तिस-या क्षेत्रस्तरावरील (Phase-३) होणा-या मूल्यांकनाच्या अनुषंगाने कामे करून घेणेबाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेने मा.केंद्र शासनाची स्वच्छ भारत व मा.शासनाची स्वच्छ महाराष्ट्र अभियानामध्ये सहभाग नोंदविलेला आहे. त्या अनुषांगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या बुरूडगांव स.नं.३४ येथे असणा-या विविध प्रकल्पांच्या सुशोभिकरण ,रंगरंगोटी करून घेणे तसेच स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने बुरूडगांव कचरा डेपो येथे आवश्यक रंगरंगोटी व सुशोभिकरण करणे व शहरातील शासकीय इमारती रंगरंगोटी करून घेणे आवश्यक असल्याने मे.सहकार्य सप्लायर्स ॲण्ड मुव्हर्स ,अहमदनगर या संस्थेचे दर मंजुर खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | कामाचा तपशील | संस्थेचे मंजुर दर | कामाचे परिमाण | एकुण दर |
|---|---|---|---|---|
| १ | ऑईल पेंटव्दारे रंगकाम | रू.१००/- प्रति स्केअर फुट | अंदाजे १०,००० स्केअर फुट | रू १०,००,०००/- |
| २ | वॉलपेंन्टव्दारे रंगकाम | रू.६०/- प्रति स्केअर फुट | अंदाजे ३५ हजार स्केअर फुट | रू २१,००,०००/- |
| ३ | लोखंडी फ्रेमसहीत होडींग प्रति स्केअर फुट | रू५५/- प्रति स्केअर फुट | ८x ४ चे एकुण ९ नग | रू १५,८४०/- |
| ४ | बॅनर | रू.३५प्रति स्केअर फुट | ६x ४ चे एकुण १० नग | रू.८४००/- |
| | | | एकुण | रू.३१,२४,२४०/- |

वरील प्रमाणे नमूद कामे करून घेणे आवश्यक असल्याने मंजुर दरानुसार मे.सहकार्य सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स, अहमदनगर यांचेकडून कामे करून घेण्यास व याकामी येणा-या खर्चास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका,

सही/-
(यशवंत डांगे)
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका,